नानाजी देशमुख कृषी संजीवनी प्रकल्प,

डॉ पंजाबराव देशमुख कृषी विद्यापीठ, परभणी भारत मौसम विभाग

ईमेल - mahapocra@gmail.com, gkmparbhani@yahoo.com

**परभणी कृषि हवामान सल्ला** **शुक्रवार, दिनांक – २१.०८.२०२०**

| हवामान घटक | हवामान अंदाज (दिनांक २२ ते २५ ऑगस्ट २०२०) | | | | |
|---|---|---|---|---|---|
| दिनांक | २२/०८ | २३/०८ | २४/०८ | २५/०८ | २६/०८ |
| पाऊस (मिमी) | १४.० | ००.० | ००.० | ०३.० | ०८.० |
| कमाल तापमान (अं.से.) | २७.० | २८.० | २८.० | २७.० | २७.० |
| किमान तापमान (अं.से.) | २३.० | २३.० | २३.० | २३.० | २३.० |
| ढग स्थिती (आकाश) | ढगाळ | ढगाळ | ढगाळ | ढगाळ | ढगाळ |
| सकाळची सापेक्ष आर्द्रता (%) | ८९ | ८५ | ८४ | ८५ | ८३ |
| दुपारची सापेक्ष आर्द्रता (%) | ७८ | ६७ | ६० | ५६ | ५७ |
| वा-याचा वेग (किमी / तास) | १५ | १४ | १३ | १२ | १४ |
| वा-याची दिशा | नैऋत्य | नैऋत्य | नैऋत्य | नैऋत्य | पश्चिम |

| हवामानाचा इशारा | जिल्हयात पुढील पाच दिवसात आकाश ढगाळ राहील. परभणी जिल्हयात दिनांक २२ ऑगस्ट २०२० रोजी तुरळक ठिकाणी हलका तर इतर काळात अतिशय हलक्या स्वरूपाच्या पावसाची शक्यता आहे. | |
|---|---|---|
| पिकांचे नाव | अवस्था | कृषि हवामान सल्ला |
| सोयाबीन | फुलधारणा ते शेंगा वाढीची अवस्था | मागील काही दिवसात झालेल्या पावसामुळे व पुढील काळात पडणा-या पावसाच्या अंदाजानूसार पिकात पाणी साचणार नाही याची दक्षता घ्यावी. सोयाबीन पिकात पाणी साचले असल्यास पाण्याचा निचरा होईल अशी व्यवस्था करावी. मागील काही दिवसात पाऊस, ढगाळ वातावरण व वाढलेली आर्द्रता यामुळे सोयाबीन पिकावर पानावरील ठिपके व शेंगा करपा याचा प्रादुर्भाव वाढण्याची शक्यता आहे. याच्या व्यवस्थापनासाठी टेब्युकोनॅझोल १० % + सल्फर ६५ % (संयुक्त बुरशीनाशक) ५०० ग्रॅम किंवा टेब्युकोनॅझोल २५.९ % २५० मिली प्रती एकर पावसाने उघाड दिल्यास फवारणी करावी. सोयाबीन पिकात अन्नद्रव्याची कमतरता दिसून येत असल्यास ००:५२:३४ १०० ग्रॅम प्रती १० लिटर पाण्यात मिसळून पावसाने उघाड दिल्यास फवारणी करावी. |
| खरीप ज्वारी | वाढीची अवस्था | मागील काही दिवसात झालेल्या पावसामुळे व पुढील काळात पडणा-या पावसाच्या अंदाजानूसार पिकात पाणी साचणार नाही याची दक्षता घ्यावी. खरीप ज्वारी पिकात पाणी साचले असल्यास पाण्याचा निचरा होईल अशी व्यवस्था करावी. खरीप ज्वारी पिकावर लष्करी अळीचा प्रादुर्भाव दिसून येत असल्यास याच्या व्यवस्थापनासाठी इमामेक्टीन बेन्झोएट ५ % ४ ग्रॅम किंवा स्पिनेटोरम ११.७ एससी ४ मिली प्रती १० लिटर पाण्यात मिसळून पावसाने उघाड दिल्यास वरील किटकनाशकांची आलटून पालटून पावसाने उघाड दिल्यास फवारणी करावी. |
| बाजरी | वाढीची अवस्था | मागील काही दिवसात झालेल्या पावसामुळे व पुढील काळात पडणा-या पावसाच्या अंदाजानूसार पिकात पाणी साचणार नाही याची दक्षता घ्यावी. बाजरी पिकात पाणी साचले असल्यास पाण्याचा निचरा होईल अशी व्यवस्था करावी. |
| ऊस | वाढीची अवस्था | मागील काही दिवसात झालेल्या पावसामुळे व पुढील काळात पडणा-या पावसाच्या अंदाजानूसार पिकात पाणी साचणार नाही याची दक्षता घ्यावी. पाऊस झाल्यानंतर ऊस पिकात पाणी साचणार नाही याची दक्षता घ्यावी. पिकातील अतिरीक्त पाण्याचा निचरा होईल |

| | | |
|---|---|---|
| | | अशी व्यवस्था करावी. सध्याचे ढगाळ वातावरण पाऊस व आर्द्रतेमुळे ऊस पिकावर रसशोषन करणा-या किडींचा (पांढरी माशी, पाकोळी) प्रादुर्भाव दिसून येत असल्यास याच्या व्यवस्थापनासाठी क्लोरपायरीफॉस २०% ३० मिली प्रती १० लिटर पाण्यात मिसळून पावसाने उघाड दिल्यास फवारणी करावी. |
| हळद | वाढीची अवस्था | मागील काही दिवसात झालेल्या पावसामुळे व पुढील काळात पडणा-या पावसाच्या अंदाजानूसार पिकात पाणी साचणार नाही याची दक्षता घ्यावी. हळद पिकात पाणी साचले असल्यास पाण्याचा निचरा होईल अशी व्यवस्था करावी. हळद पिकात कंदमाशीचा प्रादुर्भाव दिसून येत असल्यास याच्या व्यवस्थापनासाठी १५ दिवसांच्या अंतराने क्विनालफॉस २५ % २० मि.ली. किंवा डायमिथोएट ३० % १० मि.ली. प्रति १० लिटर पाण्यात मिसळून चांगल्या दर्जाचे स्टिकरसह पावसाने उघाड दिल्यास आलटुन-पालटून फवारणी करावी, उघडे पडेलेले कंद मातीने झाकून घ्यावेत. (हळद पिकावर केंद्रीय किटकनाशक मंडळातर्फे लेबल क्लेम नसल्यामुळे विदयापीठ शिफारशीत संशोधनाचे निष्कर्ष दिले आहेत). अन्नद्रव्याच्या कमतरतेमूळे हळद पिक पिवळे पडत असल्यास याच्या व्यवस्थापनासाठी हळद पिकात ग्रेड-२ सुक्ष्म अन्नद्रव्याची ५० ग्रॅम प्रती १० लिटर पाण्यात मिसळून पावसाने उघाड दिल्यास फवारणी करावी. |
| संत्रा /मोसंबी | वाढीची अवस्था | मागील काही दिवसात झालेल्या पावसामुळे व पुढील काळात पडणा-या पावसाच्या अंदाजानूसार फळपिकात पाणी साचणार नाही याची दक्षता घ्यावी. संत्रा / मोसंबी फळबागेत पाणी साचले असल्यास पाण्याचा निचरा होईल अशी व्यवस्था करावी. फळबागेत अन्नद्रव्याच्या कमतरतेमूळे फळगळ दिसून येत असल्यास याच्या व्यवस्थापनासाठी ०.५ किलो युरीया प्रती झाड खतमात्रा दयावी. तसेच १.५ किलो युरीया + ३० मिली प्लॅनोफिक्स १०० लिटर पाण्यात मिसळून पावसाने उघाड दिल्यास फवारणी करावी. |
| डाळिंब | काढणी अवस्था | मागील काही दिवसात झालेल्या पावसामुळे व पुढील काळात पडणा-या पावसाच्या अंदाजानूसार फळपिकात पाणी साचणार नाही याची दक्षता घ्यावी डाळिंब फळबागेत पाणी साचले असल्यास पाण्याचा निचरा होईल अशी व्यवस्था करावी. सध्याचे ढगाळ वातावरण व वाढलेली आर्द्रता यामूळे डाळिंब पिकावर बॅक्टेरीयल ब्लाईट (तेल्या) रोगाचा प्रादुर्भाव दिसून येत असल्यास कॉपर ऑक्सीक्लोराईड किंवा कॉपर हायड्रॉक्साईड २५ ग्रॅम + स्ट्रेप्टोसायक्लीन ५ ग्रॅम किंवा ब्रोनोपॉल ५ ग्रॅम प्रती १० लिटर पाण्यात मिसळून पावसाने उघाड दिल्यास फवारणी करावी. तोडणीस तयार असलेल्या फळांची तोडणी करून घ्यावी. |
| चिकू | वाढीची अवस्था | मागील काही दिवसात झालेल्या पावसामुळे व पुढील काळात पडणा-या पावसाच्या अंदाजानूसार फळपिकात पाणी साचणार नाही याची दक्षता घ्यावी. चिकू फळबागेत पाणी साचले असल्यास पाण्याचा निचरा होईल अशी व्यवस्था करावी. |
| फुल शेती | वाढीची अवस्था | मागील काही दिवसात झालेल्या पावसामुळे व पुढील काळात पडणा-या पावसाच्या अंदाजानूसार फुलपिकात पाणी साचणार नाही याची दक्षता घ्यावी. फुलपिकात पाणी साचले असल्यास पाण्याचा निचरा होईल अशी व्यवस्था करावी. पुढील काळात गणपती, गौरी सणांमूळे बाजारपेठेत फुलांना अधिक मागणी असते काढणीस तयार असलेल्या फुलांची काढणी टप्याटप्याने करावी व प्रतवारी करून बाजारपेठेत पाठवावी. |
| भाजीपाला | वाढीची अवस्था | मागील काही दिवसात झालेल्या पावसामुळे व पुढील काळात पडणा-या पावसाच्या अंदाजानूसार भाजीपाला पिकात पाणी साचणार नाही याची दक्षता घ्यावी. भाजीपाला पिकात पाणी साचले असल्यास पाण्याचा निचरा होईल अशी व्यवस्था करावी. सततच्या ढगाळ वातावरणामूळे भाजीपाला पिके उदा. टोमॅटो, भेंडी, मिरची, दोडके, भोपळा, कारली इत्यादी पिकांवर भुरी रोगाचा प्रादुर्भाव दिसून येत असल्यास रोगट पालापाचोळा नष्ट करून शेत स्वच्छ ठेवावे व गंधक ८० % डब्ल्युपी २५ ग्रॅम किंवा कार्बेन्डाझिम ५० % डब्ल्युपी १० ग्रॅम किंवा प्रोपीकोनॅझोल २५ % ५ मिली किंवा मायक्लोब्युटॅनील १० % १० ग्रॅम प्रती १० लिटर पाण्यात मिसळून पावसाने उघाड दिल्यास फवारणी करावी. |
| चारा पिके | वाढीची अवस्था | मागील काही दिवसात झालेल्या पावसामुळे व पुढील काळात पडणा-या पावसाच्या अंदाजानूसार चारापिकात पाणी साचणार नाही याची दक्षता घ्यावी. चारा पिकात पाणी साचले असल्यास पाण्याचा निचरा होईल अशी व्यवस्था करावी. चा-यासाठी लागवड केलेल्या मका |

| | | |
|---|---|---|
| | | पिकाची कापनी ६५ ते ७० दिवसांनी करावी. पिक ५० टक्के फुलो-यात असताना मक्याची कापनी करावी. |
| तुती रेशीम उदयोग | -- | फांदया, तुती पाने खादय पातळ एका थरात दयावे. जास्तीचे खादय देऊ नये फांदया खादय दिवसातून तीन वेळा दयावे. रेशीमकिटक कात अवस्थेत बसताना चुना पावडर रॅकवर धुरळणी करावी. यामुळे बेडवरील आर्द्रता कमी होण्यास मदत मिळते. किटक कातेवरून बाहेर पडते वेळी अर्धा तास अगोदर विजेता निर्जंतूक पावडर बरोबर डायथेन एम-४५ बुरशीनाशक २० ग्रॅम प्रती किलो मिसळून रॅकवर धुरळणी करावी. पाऊस चालू असेल तर फांदया खाऊ घालण्या अगोदर अर्धा ते एक तास पानावरील पाणी निचरून जाऊ दयावे व नंतर अळयांना खादय दयावे. |

सदर कृषि सल्ला पत्रिका डॉ पंजाबराव देशमुख कृषि विद्यापीठ, परभणी येथील ग्रामीण कृषि मौसम सेवा योजनेतील तज्ञ समितीच्या शिफारशीवरून तयार करून प्रसारित करण्यात आली असून नानाजी देखमुख कृषी संजीवनी प्रकल्प कार्यालय मुंबई येथून प्रसारित करण्यात आलेली आहे.